**नियमित दिवाणी कब्जा क्र. १२३/२०१३ मधील नि.क्र. ११२ वरील आदेश**

( पारीत दिनांक – ०५/०३/२०२४)

श्री. सत्याप्पा गणपती गंदुगडे वगैरे वि. श्री. अब्दुलसार मोहिद्दीन नदाफ वगैरे

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६ नियम १७ अन्वये निशाणी क्र. १०८ व १०९ तसेच वारसाचे अर्जामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीच्या कथनानुसार, वादींनी प्रतिवादी यांचेविरुध्द हक्कज्ञापन व कायम मनाईचा दावा दाखल केलेला आहे. दरम्यानचे काळामध्ये प्रतिवादी क्र. ३ श्री. तुकाराम कृष्णा केसरकर हे दि. ०५/०९/२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्यांची पत्नी श्रीमती अनुसया कृष्णा केसरकर ही देखील मयत झालेली आहे. त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकरीता वादीतर्फे निशाणी क्र. १०८ व १०९ अन्वये वारस रेकॉर्डवर घेणेकरीता अर्ज दिलेले आहेत. त्यानुसार, वरील वारसांना नोटीस पाठविणेबाबत न्यायालयाने आदेश केला आहे. सदर नोटीसीचा रिपोर्ट निशाणी क्र. १११ वर दाखल आहे. त्या बेलीफ रिपोर्टनुसार प्रतिवादी क्र. ३ यांचे वारसांचे वडीलांचे नाव 'कृष्णा' असे करणेत आले आहे. त्या ऐवजी 'तुकाराम' असे होणे आवश्यक आहे. सबब प्रतिवादी क्र. ३ यांचे वारसांची नावे निशाणी क्र. १०८, १०९ व वारसांचे अर्जामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी याकरीता प्रस्तुतचा दुरुस्ती अर्ज दाखल करण्यात आला आहे.

३. सदरील अर्जास प्रतिवादी यांनी अर्जाच्या खालील बाजूस त्यांचे म्हणणे दाखल केले असून सदरचा अर्ज खोटा, चुकीचा असून अर्जामुध्ये दुरुस्ती करणेबाबत कोणतीही तरतुद नाही. तथापि, नामंजूर करणेत यावा अशी प्रतिवादीनी विनंती केली आहे.

४. उभय बाजुच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५. प्रस्तुत प्रकरणी दावा हा हक्क्ज्ञापनासाठी व कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. बेलीफ रिपोर्टनुसार प्रतिवादी क्र. ३ यांचे वारसांचे वडीलांचे नाव 'कृष्णा' ऐवजी 'तुकाराम' असे करणे गरजेचे आहे. सदर दुरुस्तीची मागणी ही प्रस्तुत अर्जान्वये करण्यात आली असून, दाव्यातील समन्सची योग्यरित्या बजावणी

होण्याकरीता वरील दुरुस्ती ही गरजेची आहे. तसे न झालेस समन्स बजावणी योग्य रितीने होणार नाही. सबब, वरीलप्रमाणे नावामध्ये दुरुस्ती मंजूर करणे योग्य राहील. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतोः–

**– आ दे श –**

१) अर्ज (निशाणी क्र.११२) मंजूर करण्यात येतो.

२) वादीनी मंजूर दुरुस्ती अर्जाप्रमाणे प्रस्तावित दुरुस्ती निशाणी क्र. १०८ व १०९ तसेच वारसांचे अर्जामध्ये त्वरीत करुन घ्यावी.

३) खर्चासंबंधी कोणताही आदेश नाही.

स्वाक्षरी/–.

कागल. **(अमोल भारत जवळे)**

दिनांक – ०५/०३/२०२४ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.